Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.3
ISSN No. 2456-1665

# स्त्री बालमजूर कामगारांचा अभ्यास: संदर्भ यवतमाळ जिल्हा

**धाये गणेश मधुकरराव**
संशोधक,
संशोधन केंद्र - महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर

**प्रस्तावना**

एकीकडे भारत नेत्रदिपक प्रगतिच्या माध्यमातून जागतिक महासत्तेकडे वाटचाल करीत आहे, तर दुसऱ्या बाजूला वालकामगारांची समस्या निर्माण झाली आहे. ही समस्या समाजाला लागलेली किड असून बालकांचे शोषण करणारी, आरोग्यास बाधक, बालकाचे बालपण हिरावून घेणारी आहे. बालपण म्हटले की. प्रत्येक मनुष्याला हवाहवासा वाटणारा काळ म्हणजेच बालपणाच्या नुसत्या आठवणी जरी काढल्या तरी प्रत्येक जण थेट त्या वयातच जावून पोहचतो. म्हणजेच हा काळ प्रत्येकांच्या जीवनाचा अत्यंत महत्त्वाचा काळ होय. आईच्या कुशीत शिरुन तिच्याजवळ हट्ट धरणे, वडिलांच्या शिस्तबध्द व प्रेमळ धाकाखाली वावरणं, तर कधी भावडं, मित्र-मैत्रिण यांच्या सोबत खेळणे, भांडण पुन्हा रुसलेल्यांची समजूत काढणे. त्याच्या सोबत भावी आयुष्याची स्वप्न पाहण्याचे बालपणाचे वय असते. लहान वयात मुलांनो-मुलींनी मुक्तपणे खेळावे, नाचावे, गाणी म्हणावी एवढीच अपेक्षा असते. परंतु भारतासारख्या देशात अशी कितीतरी लहान मुले-मुली आहेत ज्यांच्या वाट्याला हा आनंदच येत नाही. डोक्यावर तळपणारे ऊन, कोसळणारा पाऊस व गारवून टाकणारी थंडी. या तिन्ही मोसमात या बालकांना खेळणे किंवा अभ्यास करण्याऐवजी बारा-बारा तास काम करावे लागते. एवढे करुनही त्यांच्या वाट्याला उपासमार येतेच, त्यांची पिळवणूक व शोषण हे होतेच. बालकामगार ही जशी बिकट समस्या आहे तशीच स्त्री बालकामगार हो एक विश्वव्यापी, गुंतागुंतीची व सामाजिक समस्या आहे. सद्यस्थितीला स्वी ही सुरक्षित नाही. त्यामुळे आणखीनच स्वो बालकामगारांना धोका हा जास्तच आहे. ज्या ठिकाणी स्वी वालकामगार काम करीत आहेत. त्या ठिकाणी असलेले वातावरण, तिच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन, तिच्यासोबतची वागणूक या सर्व गोष्टिंचा परिणाम हा तिच्या आयुष्याशी संबंधित आहे. बालपण हे कोमल असते. जसे तिचे शरीर कोमल असते तसेच तिचे मनही कोमल असते. त्यामुळे या वयात जर तिच्या मनावर व शरीरावर आघात झाला तर तो चिरकाळ टिकणारा व तिच्या सुंदर आयुष्याची वाताहत करणारा ठरु शकतो. त्यामुळे त्या ठिकाणी संरक्षण मिळण हे तिच्यासाठी अत्यंत गरजेच आहे. तसेच जी स्वी बालमजूर धोकादायक ठिकाणी काम करतात त्यांचा परिणाम त्यांच्या शारीरिक विकासावर होत असतो. त्यामुळे त्यांना अनेक व्याधिना सामोरे जावे लागते.

या ठिकाणी शिक्षणाचा देखील परिणाम दुर्लभ असल्याने त्याचे नुकसान त्यांना व त्यांच्या संपूर्ण कुटूंबाला सहन करावे लागते. कारण अशिक्षितपणा हा देखील बेकारीला खतपाणी घालणारा घटक आहे. डॉ. शरदचंद्र गोखले यांनी बालकामगार प्रथेचे स्वरुप विषद करताना म्हटले की, वचिततेने मुलांचा व्यक्तिमत्त्वात बदल होतो. महायुध्द, नैसर्गिक आपत्ती यापेक्षाही भयानक परिणाम हा बालकामगार प्रथेतून होतो. भारतीय राज्यघटनेत देशातील बालकामगारांना संरक्षण मिळावे म्हणून ६ ते १४ वयोगटातील मुला-मुलींना मोफत व सक्तीचे शिक्षण आणि बाल वयोगटातील कोणत्याही बालकास कारखाण्यात किंवा खाणीत काम करण्यासाठी कामगार ठेवले जाणार नाही, अशी घटनात्मक तरतूद आहे. असे असून सुध्दा संयुक्त राष्ट्र संघटनेच्या अंदाजानुसार जगातील पाच

Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.3
ISSN No. 2456-1665

बालकामगारांपैकी एक भारतीय बाल कामगार आहे. १४ वर्षांखालील ४० टक्के लोकसंख्येपैकी १/६ बालकामगार भारतात आहेत. १९९३ च्या भारत सरकारच्या अहवालानुसार देशातील १५ वर्ष वयोगटातील १७.४ दशलक्ष बालकामगार होती. त्यापैकी ६८ टक्के ग्रामीण तर २४ टक्के शहरात बालकामगार होते. त्यातल्या त्यात स्वी कामगारांची संख्या बरीच आहे. ही संख्या फटाके, आगपेटी, कापड उद्योग, हॉटेल, घरकाम, गालीचे, बिडी उद्योग, हिऱ्यांना पेलु पाडण्याचा व्यवसाय अशा धोकादायक कामात गुंतलेल्या आहेत.

राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाच्यावतीने किंवा त्यांच्या मताप्रमाणे वालकामगारांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. त्यामुळे बालकामगारांच्या समस्येचे गंभीर स्वरुप ओळखून संयुक्त राष्ट्र संघटनेने १९७९ हे वर्ष आंतरराष्ट्रीय बालक वर्ष म्हणून साजरे केले. त्यामुळे या समस्येकडे सामाजिक कार्यकर्ते, अर्थतज्ञ, प्रशासक यांचे लक्ष वेधले. चर्चा, परिसंवाद, कार्यशाळा, परिषदा ते कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, न्यायालयापर्यंत यांची व्याप्ती पोहचली. त्यामुळे भारतीय संविधानात बालकामगारांच्या कल्याणासाठी तरतुदी केल्या आहेत. तसेच केंद्र व राज्य शासनाने कायदेशीर तरतुदी केल्या आहेत. विविध चौकशी आयोग नेमले, अनेक संस्था स्थापन केल्या. १९८२ मध्ये बालकामगार विषयक ३० कायदे अस्तित्वात आले. परंतु स्त्री बालकामगार या समस्येपुढे कायदे अपरिणामकारक ठरले. परिणामी बालकांना बालमजूर म्हणून काम आताही पाहावे लागत आहे.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये**

१. यवतमाळ जिल्ह्यातील स्त्री बालमजुरांचा सामाजिक व शैक्षणिक परिस्थितीचा अभ्यास करणे.
२. कामाच्या जागेवरील वातावरण व त्या वातावरणाचा बालमजुरांच्या आरोग्यावर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास करणे.
३. स्त्री बालकामगारांच्या समस्या शोधून त्या समस्या निर्मूलनासाठी शासनाची भूमिका स्पष्ट करणे.

**संशोधन पध्दती**

प्रस्तुत संशोधनात यवतमाळ जिल्ह्यातील स्वी बालमजुरांचा अभ्यास केला आहे. तसेच त्यांना मिळणारी मजुरी व त्यांचे त्यावरील त्यांचे जिवनमान यांना मुख्य माणून येथे सर्वेक्षण पध्दती निवडली होती. निवडलेल्या विषयाच्या संशोधनासाठी विश्लेषणात्मक व वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आलेला असून विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीत उपलब्ध माहितीचे टिकात्मक परिक्षण केले आहे. वर्णनात्मक संशोधन पध्दतीत. यवतमाळ जिल्ह्यातील स्वो बालमजूर कामगारांच्या दृष्टीने राबविण्यात आलेल्या योजना, योजनेचा लाभ व अंमलबजावणी यांचा आढावा घेतला आहे.

**स्त्री बालमजूर कामगारांची धार्मिक स्थिती दर्शवणारा तक्ता**

| क्र. | धर्म | संख्या | प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | हिंदू | ८९ | ४४.५ |
| २. | मुस्लिम | ०७ | ३.५ |
| ३. | बौद्ध | ९९ | ४९.५ |
| ४. | शिख | ०५ | २.५ |
| | एकूण | **२००** | **१००.००** |

वरील तक्तयावरून असे दिसून येते की, हिंदू धर्मात स्वो बालमजूर कामगारांची संख्या ८९ असून त्यांचे शेकडा प्रमाण पाहता ४४.५ टक्के एवढे आहे. मुस्लिम धर्मात स्त्री बालमजूर कामगारांचो संख्या ७ असून त्यांचे शेकडा प्रमाण पाहता ३.५ टक्के एवढे आहे. बौध्द धर्मात स्वी बालमजूर कामगारांची संख्या ९९ असून त्यांचे शेकडा प्रमाण पाहता ४९.५ टक्के एवढे आहे. शिख धर्मात स्त्री बालमजूर कामगारांची संख्या ५ असून त्यांचे शेकडा प्रमाण पाहता २.५ टक्के एवढे आहे.

वरील तक्त्यामध्ये यवतमाळ शहरातील स्वी बालमजूर कामगारांचा धर्मा नुसार आढावा घेण्यात आला. यामध्ये बौध्द धर्मामध्ये सर्वात जास्त स्वी बालमजूर कामगारांचे प्रमाण दिसून आले त्या खालोखाल हिंदू धर्मामध्ये स्त्री बालमजूर कामगारांचे प्रमाण मोठ्या प्रमाणावार आहे. म्हणजेच हिंदू आणि बौध्द धर्मामध्ये दारिद्र्याचे प्रमाण जास्त प्रमाणात आहे. मुस्लिम आणि शिख धर्मामध्ये स्त्री बालमजूर कामगारांचे प्रमाण अतिश नगन्य आहे. मुस्लिम आणि शिख धर्मामध्ये स्वी बालमजूर कामगारांचे प्रमाण कमी असण्याचे कारण जाणून घेतले असता असे दिसून आले की, मुस्लिम धार्मामध्ये स्वी बालकांना घरा बाहेरील काम करण्यास मनाई असल्याने ते घरामध्येच काम करतात. तर शिख धर्मातील नागरिक मोठ्या प्रमाणावर व्यवसायाशी निगडित असल्यामुळे सर्व बाबतीत त्यांचा दर्जा उंचावलेला आहे. असल्यामुळे स्वो बालमजूर समस्या दिसून येत नाही. या तुलनेत हिंदू व बौध्द धर्मात मोठ्या प्रमाणात गरीबी असल्यामुळे बालकांना काम करणारे भाग पडते.

स्त्री बालमजूर कामगारांच्या कुटुंबाचे स्वरुप दर्शवणारा तक्ता

| क्र. | कुटुंबाचा प्रकार | संख्या | प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | संयुक्त | ११ | ५.५ |
| २. | विभक्त | १४३ | ७१.५ |
| ३. | घटस्फोटीत | १७ | ८.५ |
| ४. | भग्न | १३ | ६.५ |
| ५. | स्वतंत्र | १६ | ८ |
| | **एकूण** | **२००** | **१००.००** |

वरील तक्तामध्ये स्त्री बालमजूर कामगारांच्या कुटूंबाच्या स्वरुपा विषयी माहिती जाणून घेण्यात आली. यावरून संयुक्त कुटूंबामध्ये राहणाऱ्या स्त्री बालमजूर कामगारांची संख्या ११ असून त्यांचे शेकडा प्रमाण पाहता ५ टक्के एवढे आहे. विभक्त कुटुंबामध्ये राहणाऱ्या स्त्री बालमजूर कामगारांची संख्या १४३ असून त्यांचे शेकडा प्रमाण पाहता ७१.५ टक्के एवढे आहे. घटस्फोटीत कुटुंबामध्ये राहणाऱ्या स्वी बालमजूर कामगारांची संख्या १७ असून त्यांचे शेकडा प्रमाण पाहता ८.५ टक्के एवढे आहे. भग्न कुटूंबामध्ये राहणाऱ्या स्त्री बालमजूर कामगारांची संख्या १३ असून त्यांचे शेकडा प्रमाण पाहता ६.५ टक्के एवढे आहे. स्वतंत्र कुटुंबामध्ये राहणाऱ्या स्वी बालमजूर कामगारांची संख्या १६ असून त्यांचे प्रमाण पाहता ८ टक्के एवढे आहे.

जगामध्ये भारतीय कुटूंबाची ओळख ही संयुक्त कुटुंब प्रधान संस्कृती म्हणून ओळख आहे. परंतु आज भारतामध्ये वास्तविक चित्र उलटे आहे. कारण आज ज्या कुटुंबामध्ये गरिबीचे प्रमाण जास्त आहे त्या कुटूंबाचे स्वरुप विभक्त स्वरुपाचे आहे. या उलट ज्या कुटुंबामध्ये उत्पन्नाचे साधने आणि संपत्ती आहे अशाच कुटूंबात संयुक्त

कुटूंब अस्तित्वात असलेले दिसून येते. संशोधन कार्यासाठी संशोधन केलेल्या कुटूंबाची पार्श्वभूमि गरीब असल्यामुळे त्यांच्यामध्ये विभक्त कुटूंब पध्दतीचे प्रमाण सर्वात जास्त आहे. करारामध्ये काही कारणास्तव माता-पिता बरोबर जमत नसल्यामुळे स्वतंत्र कुटूंबाचे ही नमुने दिसून आले. संयुक्त कुटूंबात बालकांना काम करण्याची आवश्यकता नसते. परंतु विभक्त, घटस्फोटीत आणि स्वतंत्र कुटूंबात सर्वांना काम केल्या शिवाय पर्याय नसतो. म्हणून या कुटुंबात स्वी बालमजूर कामगारची समस्यांचे प्रमाण कमी होण्याऐवजी वाढत आहे.

**स्त्री बालमजूर कामगारांच्या कुटुंबातील काम करणाऱ्या व्यक्तींची स्थिती दर्शवणारा तक्ता**

| **क्र.** | **कमावत्या व्यक्ती** | **संख्या** | **प्रमाण** |
|---|---|---|---|
| १. | एक | १०३ | ५१.५ |
| २. | दोन | ८१ | ४०.५ |
| ३. | तीन | ०९ | ४.५ |
| ४. | चार | ०६ | ३ |
| ५. | पाच | ०१ | ०.५ |
| | एकूण | **२००** | **१००.००** |

वरील तक्तामध्ये स्वो बालमजूर कामगारांच्या कुटुंबामध्ये काम करणाऱ्या व्यक्तीचा आढावा घेण्यात आला. यावरुन असे स्पष्ट होते की, एक व्यक्ती काम करण्याची संख्या कुटुंबामध्ये १०३ असून त्यांचे प्रमाण पाहता ५१.५ टक्के एवढे आहे. दोन व्यक्ती काम करण्याची संख्या कुटुंबामध्ये ८१ असून त्यांचे शेकडा प्रमाण पाहता ४०.५ टक्के एवढे आहे. तीन व्यक्ती काम करणा-याची संख्या कुटूंबामध्ये ०९ असून त्यांचे शेकडा प्रमाण पाहता ४.५ टक्के एवढे आहे. चार व्यक्ती काम करण्याची संख्या कुटुंबामध्ये ०६ असून त्यांचे प्रमाण पाहता ३ टक्के एवढे आहे. पाच व्यक्ती काम करण्याची संख्या कुटुंबामध्ये ०१ असून त्यांचे प्रमाण पाहता ०.५ टक्के एवढे आहे.

वरील माहिती वरुन असे निदर्शनास येते की, स्त्री बालमजूर कामगारांच्या कुटुंबामध्ये एक्या व्यक्तीवर अवलंबून असलेल्या कुटूंबाचे प्रमाण ५१.५ टक्के एवढे आहे. त्यामुळे एकच व्यक्ती कमावती असल्यामुळे कुटुंबाना आर्थिक समस्यांना समोर जावे लागत आहे. काही कुटुंबात चार किया पाच व्यक्तो कमावत्या आहेत त्यांचे प्रमाण अगदी अल्प आहे. त्याबरोवरच तीन किंवा चार व्यक्ती कमावणाऱ्या असल्या तरी सर्वांचे मिळूण होणारे उत्पन्न अतिशय कमी होते. म्हणून स्वी बालमजूर कामगारांना अन्य ठिकाणी काम केल्याशिवाय त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न सुटत नाही.

**स्त्री बालमजूर कामगारांच्या कुटुंबातील निरुपयोगी व्यक्तींची संख्या दर्शवणारा तक्ता**

| क्र. | निरूपयोगी व्यक्ती | संख्या | प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | एक | ११ | ५.५ |
| २. | दोन | १३६ | ६५ |
| ३. | तीन | ३७ | १८.५ |
| ४. | चार | १३ | ६.५ |
| ५. | पाच | ०३ | १.५ |
| | एकूण | **२००** | **१००.००** |

वरील तक्तामध्ये स्त्री बालमजूर कामगारांच्या कुटुंबामध्ये काम न करु शकणाऱ्या व्यक्तीचा आढावा घेण्यात आलेला आहे. या तक्त्यावरुन असे निदर्शनास येते को, एक व्यक्ती काम न करु शकणाऱ्या व्यक्तीची कुटुंबामध्ये संख्या ११ असून त्यांचे शेकडा प्रमाण पाहता ५.५ एवढे आहे. दोन व्यक्ती काम न करु शकणाऱ्या व्यक्तीची कुटुंबामध्ये संख्या १३६ असून त्यांचे त्यांचे शेकडा प्रमाण पाहता ६५ एवढे आहे. तीन व्यक्ती काम न करु शकणाऱ्या व्यक्तीची कुटुंबामध्ये संख्या ३७ असून त्यांचे त्यांचे शेकडा प्रमाण पाहता १८.५टक्के एवढे आहे. चार व्यक्ती काम न करु शकणाऱ्या व्यक्तीचो कुटुंबामध्ये संख्या १३ असून त्यांचे शेकडा प्रमाण पाहता ६.५ टक्के एवढे आहे. पाच व्यक्ती काम न करु शकणाऱ्या व्यक्तींची कुटुंबामध्ये संख्या ०३ असून त्यांचे त्यांचे शेकडा प्रमाण पाहता १.५ एवढे आहे.

वरील तक्त्यांच्या माहितीवरुन असे स्पष्ट होते की, स्त्री बालमजूर कामगारांच्या कुटुंबामध्ये काम न करु शकणारी निरुपयोगी संख्या दोन असून त्यांचे शेकडा प्रमाण ६५ टक्के आहे. अशा परिस्थितीत स्वो बालमजूर कामगारांवर कुटूंबाची जबाबदारी येवून पडत असल्यामुळे त्यांना मजूरी करणे भाग पडत आहे.

**स्त्री बालमजूर कामगारांच्या कुटूंबाची स्थिती दर्शवणारा तक्ता**

| क्र | कुटुंबाची स्थिती | संख्या | प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | लहान | ०९ | ४.५ |
| २. | मध्यम | ०३ | १.५ |
| ३. | कनिष्ट | २१ | १०.५ |
| ४. | निकामी | १६७ | ८३.५ |
| | एकूण | **२००** | **१००.००** |

वरील तक्तामध्ये स्त्री बालमजूर कामगारांच्या कुटुंबाची स्थिती दर्शविण्यात आली आहे. या बरुन असे स्पष्ट होते को, लहान व्यक्तीची कुटूंबामधील संख्या ९ असून त्यांचे शेकडा प्रमाण पाहता ४.५ टक्के एवढे आहे. मध्यम व्यक्तीची कुटूंबामधील संख्या ०३ असून त्यांचे शेकडा प्रमाण पाहता १.५ टक्के एवढे आहे. कनिष्ठ व्यक्तीची कुटुंबामधील संख्या २१ असून त्यांचे शेकडा प्रमाण पाहता १०.५ टक्के एवढे आहे. निकामी व्यक्तीची कुटूंबामधील संख्या १६७ असून त्यांचे शेकडा प्रमाण पाहता ८३.५ टक्के एवढे आहे.

वरील माहिती वरुन स्वी बालमजूर कामगारांच्या कुटुंबामध्ये विविध आजार किंवा वयोवृध्द व्यक्तींचे शेकडा प्रमाण पाहता ८३.५ टक्के एवढे आहे. निकामी किंवा वयोवृध्द व्यक्तीच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न सोडविण्यासाठी स्वी बालमजूर कामगारांना वेगवेगळ्या कामावर जावे लागत आहे.

**निष्कर्ष**

१. दारिद्रय हे सर्वात महत्वाचे कारण स्त्री बालमजूर कामगार समस्येच्या मुळाशी असल्याचे आढळून आले.
२. कुटूंबातील प्रोढ व्यक्तिच्या बेरोजगारीमुळे कामास जावे लागल्याचे प्रमाण लक्षणीय आहे.
३. असाध्य आजार आणि वयोवृध्द कारणामुळे कुटूंबाची जवाबदारी बालकांवर पडल्यामुळे स्त्रो बालमजूर कामगारांची संख्या वाढत आहे.

४. कर्त्या व्यक्तीचे निधन किंवा घटस्फोटोत प्रकरणामुळे बालक बेवारस होऊन त्यांना स्वतः स्वालंबी होण्यासाठी काम करणे भाग पडत आहे.

५. विभक्त कुटुंबामध्ये राहणाऱ्या स्वो बालमजूर कामगारांचे प्रमाण ७१.५ टक्के एवढे आहे. तसेच घटस्फोटीत कुटुंबामध्ये राहणाऱ्या स्त्री बालमजूर कामगारांचे प्रमाण ८.५ टक्के आहे.

६. एक व्यक्ती कुटूंबामध्ये काम करत आहे त्यांचे शेकडा प्रमाण ५१.५ टक्के एवढे आहे.

७. कुटुंबामध्ये काम करु न शकणाऱ्या व्यक्तीचे शेकडा प्रमाण ६५ टक्के एवढे आहे.८३.५ टक्के कुटुंब विविध आजार किंवा असाध्य रोगांना बळी पडले आहेत.

**संदर्भ**

१. गुरुनाथ नाडगोडे, सामाजिक संशोधन पध्दती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००१

२. रा.श.मुळे व उमाटे, शैक्षणिक संशोधाची मूलतत्त्वे विद्याप्रकाशा, औरंगाबाद, इ.स. १९७७

३. खडसे भा, भारतातील समाज संरचाा आणि सामाजिक समस्या,

४. पाटील अजयकुमार भिमराव, बालकामगार व शिक्षकाची भूमिका, मुंबई प्रकाशन,

५. डॉ. शांता वैद्य, बालकांचे हक्क आनुवाद युनिसेफ यु.दिल्ली, इ.स. १९७९

६. आर.के. शेख-वालकामगार समस्या व समाधा, प्रशांत पब्लिकेशस, जळगांव.

७. मुलांच्या शिक्षण हक्काची हमी हा बालकामगार गीर्मूला प्रकल्प, केरवाडी,